# माझी सहधर्मचारिणी

डॉ. बिंदुमाधव गणेश जोशी

निबंधस्पर्धेच्या यादीमध्ये हा विषय पाहून मला झट्‌कन स्फूर्ती झाली; अरे व्वा! काय मस्त विषय आहे. आपल्या पत्नीबद्दलच्या भावना व्यक्त करायला काय नामी संधी आहे. पण प्रत्यक्ष लिहायला सुरूवात केल्यानंतर मात्र लक्षात येतंय की हा विषय जितका आकर्षक तितकाच अवघड आहे. पत्नी हे नातं इतकं जवळचं आहे की तिच्याबद्दल लिहिण्यासाठी जे अंतर हवं ते कल्पनेने निर्माण करणं केवळ अशक्य आहे. सगळेच गोड गोड लिहावे तर ती सत्याशी प्रतारणा होईल व काही गोष्टी खऱ्या लिहाव्यात तर या लेखाची एक वाचक, किंबहुना पहिली वाचक तीच आहे. तिने फाडून टाकला नाही तरच हा स्पर्धेसाठी जाणार. तरी पण मन घट्ट करून लिहितो तर खरे.

माझी "ही", आय मीन, माझी सौ. माझ्या आयुष्यात ४४ वर्षांपूर्वी आली. त्यावेळी मी रेल्वेच्या पोष्टात - आर. एम. एस. मध्ये नोकरी करत होतो, तर ती पोष्टातली मुलगी होती. रीतसर पाहून, चहापोहे खाऊन मी पसंती दिली. तिनेही, मुलाखतीतल्या उदारमतवादी प्रश्नावर खूष होऊन - तसा दिसायलाही मी त्यावेळी बरा होतो - आपला होकार वडिल बंधूजवळ व्यक्त केला व २३ फ़ेब्रुवारी १९६१ रोजी मुंबईच्या ब्राह्मणसभा कार्यालयात आम्ही उभयता पति-पत्नी झालो. माझ्या इच्छेला मान देऊन तिने लवकरच आपली नोकरी सोडली व माझी एकट्याची चाकरी करणे पत्करले. माझी पत्नी माझ्या आयुष्यात भाग्यलक्ष्मी ठरली. लग्नानंतर चारच महिन्यात मी एम. ए. परीक्षा उत्तीर्ण झालो व दरमहा रु. ११५ ची माझी नोकरी सोडून मी इंग्लीशचा प्राध्यापक झालो.

एस. एस. सी. मध्ये बोर्डाला 'मेरिट' लिस्ट मध्ये असूनही माझ्या करिअरचे असे काही धिंडवडे निघाले होते की माझ्या सर्व महत्त्वाकांक्षा एका पाठोपाठ गळून पडल्या होत्या व नोकरी करून पुढील शिक्षण ७ वर्षांच्या गॅपनंतर सुरू करणे भाग पडले होते. दोष कुणाचाच नव्हता, नशिबानेच पाठ फिरवली होती. नोकरी करून शिकणेही खूप त्रासदायक झाले होते. पण पत्नी आयुष्यात आली आणि तिच्या रूपाने भाग्यलक्ष्मी माझ्या आयुष्यात आली. माझे नष्टचर्य संपले आणि एका सुखी, समाधानी जीवनपथावर माझी पाऊले पडू लागली. मित्रानो, हे संपूर्ण निखळ सत्य आहे; no flattery!

लहानपणी मी देवभक्त होतो. महाशिवरात्रीला संपूर्ण शिवमाहात्म्य वाचल्या शिवाय मी पाण्याचा घोट तोंडात घेत नव्हतो; पण पुढे कोण जाणे कसा काय पण मी फार नास्तिक झालो. याच्या उलट आमच्या बाईसाहेब, कमालीच्या धार्मिक. सुरूवातीस ती देवळात देवदर्शनासाठी गेली तर मी बाहेर थांबायचो. पण तिच्या सहवासात मी कसा बदलत गेलो मला कळलंच नाही. तिने १९७३ नंतर ज्ञानेश्वरीवर प्रवचने देण्यास सुरुवात केली आणि तिचे एकही प्रवचन मी चुकवलेले नाही. मी स्वतः ज्ञानेश्वरी एकदाही वाचलेली नाही पण त्यावर प्रवचन करावे एवढी माझी आज तयारी झाली आहे. तिच्या सर्व धार्मिक कृतीमध्ये मी सावलीसारखा तिच्याबरोबर असतो; मनापासून.

तिच्या स्वभावातील एक पैलू मला अतिशय आवडतो. ती अतिशय ऋजु आहे. तिच्या मनात कोणाहीबद्दल आकस नसतो. तिच्याशी कोणीही मतलबी वृत्तीने वागला, तिचा कोणीही राग, द्वेष, मत्सर केला तरी तिच्या निष्कपट वृत्तीत अजिबात फरक पडत नाही. तिच्या या लीन, सौम्य स्वभावाचा मला काही वेळा राग येतो; मग मी तिला म्हणतो, "अगं, अहंकार, गर्व नसावा हे मला मान्य आहे, पण स्वाभिमान असायला काय हरकत आहे? दुसऱ्यामधील भगवंताला तू जपतेस, पण स्वतःतील आत्मारामाला कां गौण लेखू देतेस?" माझ्या प्रश्नांना ती काहीही उत्तर देत नाही. काही वेळा ती माझ्या मताला दुजोरा देते पण वागण्यात काहीच बदल करत नाही. अकृत्रिम सरळपणा हा तिचा स्थायीभाव आहे. बाहेर फिरायला पडल्यानंतर ओळखीच्या व्यक्तीना ती आपणहून हात उंचावून "नमस्ते, जय योगेश्वर" म्हणते; त्यांनी फारसा प्रतिसाद दिला नाही तरी तिच्या वागण्यात फरक पडत नाही. 'कुत्ता चले कुत्तेकी चाल, हाथी चले हाथीकी चाल' या तिच्या दृष्टीकोनावर मी लुब्ध आहे. मला असं वागणं कधीही जमणार नाही हे माहिती असूनही मला तिचे हे वागणे खूप आवडते. मतभेद असूनही मला ते विलोभनीय वाटते.

माझी पत्नी लहानपणापासून कष्टाळू, उद्योगी, महत्वाकांक्षी आहे. गल्लीमधल्या सर्व स्पर्धामध्ये - रांगोळी, निबंधलेखन, वक्तृत्व, खेळ - भाग घेऊन बक्षिसे मिळवण्यात तिचा हातखंडा होता. मुलांना वाढवताना, शिकवताना याच जिद्दी, विजिगिषु वृत्तीचा तिने त्यांच्याजवळ आग्रह धरला. लग्नापूर्वी हुशार असूनही तिला कॉलेजमध्ये शिकता आले नाही. लग्नानंतर मी तिला संधी दिली. तीन लहान मुले [वय ५, ४, २ वर्षे] असतानाही तिने या संधीचे सोने केले. एम. ए. परिक्षा ५९% मार्कांनी उत्तीर्ण करून ती माझ्याच महाविद्यालयात मराठीची प्राध्यापिका झाली. याच महत्वाकांक्षी जिद्दी वृत्तीचे आमच्या तिन्ही मुलांत प्रतिबिंब उमटले आहे. ती दिसायला माझ्यासारखी आहेत पण गुणांनी मुख्यतः त्यांच्या आईसारखी आहेत.

आमची ही आक्रमक नाही पण आग्रही आहे. एखादी गोष्ट तिला करायची असल्यास किंवा आमच्याकडून करून घ्यावयाची असल्यास ती असा काही चिवटपणे पिच्छा पकडते की ती गोष्ट झाल्यावरच ती शांत होते. ती हट्टीपणा करत नाही, त्रागापण करत नाही पण गोडपणाने पोटात शिरून सातत्याने पाठपुरावा करते. तिच्या कार्यसाफल्यात आम्हीही खूष होतो. She is persuasive by nature. म्हणून मी तिला अनेकवेळा The Little Dictator म्हणतो.

मी स्वभावाने स्फोटक आहे. माझी आई मला विनोदाने 'भडक्या उमराव' [वातीचा स्टोव्ह] म्हणायची. माझ्या पत्नीलाही या माझ्या स्वभावाचा खूप त्रास झाला; अजूनही होतोय. पण हळूहळू याही माझ्या दोषाशी तिने जुळवून घेतले. आपल्या लाघवी स्वभावाने तिने त्याचा कधी बाऊ नाही केला. मी शांत झाल्यावर ती सौम्यपणे माझी चूक मला पटवून द्यायची. भांडण्याचा किंवा वाद घालण्याचा मार्ग तिने कधीच अनुसरला नाही. मी आदळआपट करायला लागलो की तीच एका शांत बाजूला बसून १ ते १० आकडे मोजायला सुरुवात करायची आणि बहुतेक १० च्या आतच माझा पारा खाली आलेला असायचा आणि त्याचे रूपांतर हसण्यात व्हायचे.

तिच्यामध्ये खूप चांगले गुण आहेत. तिच्या शत्रूनेही तिचा चांगुलपणा मान्य करावा इतकी ती सरळ स्वभावाची, निगर्वी आहे. अन्नदान हा तिचा आवडता छंद आहे. काही या छंदाचा फायदा घेतात हे माहिती असूनही तिला लोकांना खायला घालायला आवडते. आमच्याकडे कधीही कोणी अतिथी आला तर तो उपाशी जाणार नाही. सुरवातीच्या आर्थिक झटापटीच्या काळात मला हे पटायचे नाही पण 'देऊन कधी कमी पडत नाही' हे तिचे सूत्र अनुभवल्यानंतर आता मी तिच्याशी वाद घालत नाही; उलट तिच्याशी सहमत होतो; विनातक्रार.

तिचा चेहरा खूप बोलका आहे. परदेशात तिला इंग्लीश बोलण्याची फारशी सवय नसूनही तिच्या खूप आंग्लभाषीय मैत्रीणी आहेत. सहजसुलभ निष्कपट हंसणं व बोलके आविर्भाव याच्या जोरावर ती त्यांच्याशी व त्या तिच्याशी दिलखुलास गप्पा मारत असतात. दुभाष्या म्हणून माझी तिला जराही गरज पडत नाही.

अशी आहे माझी सहधर्मचारिणी; सर्वार्थाने माझ्या जीवनात समरस झालेली, माझ्य़ाशी एकरूप झालेली, माझ्या सुखदु:खात सहभागी होणारी, माझ्यावर आणि माझ्या 'डॉग'वर [म्हणजे माझ्या अवगुणावरही] नितांत प्रेम करणारी, माझी प्रियतम पत्नी; माझी जीवनलक्ष्मी ! माझी सहधर्मचारिणी ! 'An obedient wife commands her husband' या इंग्लिश सुभाषिताचे मूर्तीमंत उदाहरण आहे. आजही ती कुठलीही गोष्ट माझ्या अनुमतीशिवाय करत नाही आणि मजेची गोष्ट मी तिला कशालाही नाही म्हणत नाही आणि मीही तिला सांगितल्याशिवाय काहीही करत नाही. मला वाटते सुखी संसाराचे हे विलक्षण सुंदर गमक आहे.